# भारतीय राजकारणाची आघाडयांच्या राजकारणाकडून बहुमताकडे वाटचाल – स्थिती आणि वास्तव

**प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील,** शंकरराव जगताप आर्टस अ‍ॅण्ड कामर्स कॉलेज, वाघोली ता. कोरगाव, जि. सातारा .

---

**प्रस्तावना -**

भारतामध्ये बहुपद्धती असली तरी सुरुवातीच्या ४० वर्षाच्या काळात काँग्रेस हा एकमेव प्रभावी व शक्तीशाली पक्ष होता. परंतु भारतीय पद्धतीचे स्वरूप- एकपक्षीय आहे असा निश्चित निष्कर्ष काढता येणार नाही कारण १९६७ साली भारतातील सोळा राज्यात विधानसभा निवडणूका झाल्या. त्यापैकी बिहार, केरळ, मद्रास, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल या आठ राज्यात काँग्रेस विरोधी पक्षांची सत्ता आली 1989 नंतर देशाचे राजकारण राज्यांच्या राजकारणातून निर्माण होऊ लागले जे घटक राज्याच्या पातळीपर्यंत सीमित होते ते केंद्रपातळीवर घडून आले. 1989 साली केंद्रामध्ये त्रिशंकू सरकार अस्तित्वात आले त्यालाच आपण आघाडी सरकार असे म्हणतो. भारतीय राजकारणात कोणत्याही पक्षाला १९८९ पासून ते २०१४ पर्यंत केंद्रामध्ये बहुमत मिळाले नाही त्यामुळे सत्तासंपादन करण्यासाठी आघाडी सरकारे अस्तित्वात आली. अनेक राज्यामध्येही एकापेक्षा अधिक पक्ष कधी निवडणुकीपूर्वी किंवा कधी निवडणुकांचे निकाल घोषित झाल्यावर आघाड्या तयार करतात व सत्तेवर येतात यावरून देशात आघाडयांचे राजकारण स्थिरावले आहे असा निष्कर्ष अभ्यासक काढत होते. परंतु २०१४ सालच्या १६ व्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला बहुमत मिळाले या सर्व वाटचालीचा अभ्यास आपण खालील शोधनिबंधात करणार आहे.

**संशोधनाचे उद्देश -**

१) भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचे विश्लेषण करणे.

२) भारतीय राजकारणातील आघाडयांचा अभ्यास करणे.

३) भारतीय राजकारणातील आघाडयांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधात ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अभ्यास केला आहे. यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये निवडणूक आयोगाची आकडेवारी व दुय्यम साधनांमध्ये विविध ग्रंथ नियतकालिके विविध वेबसाईटवरील माहिती वर्तमान पत्रातील लेख यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**भारतातील आघाड्यांचे राजकारण स्थिती आणि वास्तव -**

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात वित्तमंत्री असलेले विश्वनाथ प्रतापसिंह व राजीव गांधी यांचे मतभेद झाले व्ही.पी.सिंग यांनी मंत्रिमंडळाचा व कॉग्रेसचा राजीनामा दिला. भ्रष्टाचाराशी लढण्याच्या मुद्यावर जन मोर्चाची स्थापना केली. त्यातूनच तिसऱ्या आघाडीचा उदय झाला. व्ही.पी.सिंग यांनी बोफोर्स तोफा खरेदी प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सर्व आरोप राजीव गांधी यांचेवर केले. व्ही.पी.सिंगांनी अनेक विरोधी पक्षांना एकत्र घेवून जनता दल पक्षाची स्थापना केली त्यांच्या विचाराला अनेक पक्षांनी पाठींबा दिला. भ्रष्टाचार, लाचलुचपत, सत्तेचा गैरवापर बोफोर्स प्रकरण फेअरफॅक्स प्रकरण व जर्मन पाणबुड्याच्या खरेदीतील गैरव्यवहार इत्यादी कारणांमुळे काँग्रेस पक्षाच्या प्रतिनिधीत्वात घट झाली. या निवडणुकीत ५२५ जागांपैकी जनता दलाला १४१ जागा काँग्रेसला १९३ जागा भा.ज.प. ८८ व मा.क.प.३२ भा.क.प.१२, आण्णा दमुक ११ व इतर पक्षांना ३५ आणि अपक्षांना १३ जागा मिळाल्या कोणत्याही राजकीय पक्षाला लोकसभेत बहुमत मिळाले नाही. राजीव गांधी यांनी अल्पमतातील सरकार स्थापन करण्याचे नाकारले जनता दलाने व्ही.पी.सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. त्याला राष्ट्रीय मोर्चा सरकार अर्थात तिसरी आघाडी असे नाव दिले. भा.ज.प., मा.क.प., व भा.क.प व अपक्ष सदस्यांनी पाठींबा दिला. या सरकारने काँग्रेस

आणि भा.ज.प यांच्या पलीकडे राष्ट्रीय पातळीवर आणखी एक शक्ती उभारण्याचा प्रयत्न केला. भारत सरकारने सामाजिक विषमतेच्या बाबतीत विचार करून त्याबाबतचा अहवाल देण्यासाठी व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांची शिफारस करण्यासाठी श्री. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली १९७८ रोजी एक आयोग नेमला होता. त्याचा अहवाल १९८० रोजी मंडल आयोगाने केंद्र सरकारला सादर केला. मंडल आयोगाची अंमलबजावणी केली. असता मागासवर्गीय ५२ टक्के जनतेचे हित कल्याण होणार आहे, हे जाणून १३ ऑगस्ट १९९० रोजी व्ही.पी.सिंग यांच्या सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्याची अधिसूचना काढली. त्यामुळे देशभर राखीव जागा विरोधी आंदोलने दंगली घडून आल्या. भा.ज.प.ने अयोध्येतील राममंदिरे उभारण्याचा प्रश्न पुढे करून रथयात्रेचा कार्यक्रम सुरु केला. मागासवर्गीय ५२ टक्के जनतेचा पाठींबा जनता दलाला मिळेल हे ओळखून लालकृष्ण आडवाणी यांनी आयोध्या राम मंदिराचा प्रश्न पुढे आणून मंडल आयोगाला विरोध केला. भा.ज.प. ने व्ही.पी.सिंग सरकारचा पाठींबा काढला त्यामुळे व्ही.पी. सिंग यांनी राजीनामा दिला. चंद्रशेखर जनता दल पक्षातून बाहेर पडले . काँग्रेस पक्षाने त्यांना पाठींबा दिला व ते पंतप्रधान झाले परंतु अल्पावधीत त्यांचे काँग्रेस पक्षाने त्याचा पाठींबा काढून घेतला व चंद्रशेखर यांनी राजीनामा दिला अशा प्रकारे हे दोन्ही सरकारे अल्पजीवी ठरली.

१९९१ ते १९९५ या कालखंडात देशामध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार झारखंड मुक्ती मोर्चा व अपक्षांचा पाठींब्यावर अस्तित्वात होते. १९९६ सालच्या अकराव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षातील अनेक नेते भ्रष्टाचार प्रकरणांशी संबंधित होते. देशाची आर्थिक मंदी यामुळे या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा जनाधार मोठ्या प्रमाणात कमी झाला. ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला १४०, भा.ज.प. ला १६१ जनता दलाला ४६ मा.क.प. ३२ भा.क.प ला १६१ जनता दलाला ४६, मा.क.प.३२, भा.क.प १२ जागा मिळाल्या या निवडणुकीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून अटल बिहारी वाजपेयी यांनी सरकार स्थापन केले. परंतु त्यांना विश्वादर्शक ठराव जिंकता आला नाही त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला हे सरकार फक्त तेरा दिवस टिकले. जनता दल व त्यांची आघाडी पक्ष यांनी सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. जनता दलाला काँग्रेस पक्षाने पाठींबा दिला. तसेच दोन्ही डाव्या पक्षांनी या सरकारला पाठींबा दिला. जनता दलाचे एच.डी.देवेगौडा पंतप्रधान झाले. या सरकारला सतरा पक्षाचा पाठींबा होता परंतु पंतप्रधान देवेगौडा व कॉंग्रेसचे अध्यक्ष सीताराम केसरी यांचे मतभेद झाले. त्यांनी या सरकारचा पाठींबा काढून घेतला. तदनंतर संयुक्त आघाडी व काँग्रेस या दोघांची आघाडी होऊन आय.के.गुजराल यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले या सरकारला कॉंग्रेसने बाहेरून पाठींबा दिला. तथापि पुन्हा राजीव गांधींच्या हत्येच्या बाबतीतील अहवाल सादर करण्यासाठी जो जैन आयोग आठप्न केला होता. त्याने तात्पुरता अहवालातील काही भाग प्रसिद्ध केला. त्यामध्ये तामिळनाडूमधील डी.एम.के बाबत काही आक्षेपार्ह विधाने होती. कॉंग्रेसचे अध्यक्ष सीताराम केसरीनी संयुक्त सरकारमधून डी.एम.के.ला काढून टाकण्याची मागणी केली. परंतु पंतप्रधान गुजराल व संयुक्त आघाडीचे चंद्रबाबू नायडू या दोघांनीही ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे कॉंग्रेसने अविश्वास ठराव मांडला त्यास भा.ज.प. ने पाठींबा दिला व गुजराल यांना राजीनामा द्यावा लागला.

भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी चाणाक्षपणे अनेक घटक पक्षांना एकत्र करून देशामध्ये प्रथमच आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. भाजपच्या कार्यक्रम पत्रिकेतील हिंदुत्वाचा मुद्दा वगळण्याचे ठरविले त्यात प्रामुख्याने रामजन्मभूमी, काश्मीर बाबतचे ३७० कलम, समान नागरी कायदा हे मुद्धे बाजूला ठेवून भाजपाने अकाली दल, अण्णादमुक, तृणमूल काँग्रेस, समता पक्ष, बिजू जनता दल व शिवसेना या पक्षांचा पाठींबा मिळविला अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीची स्थापना १९९८ मध्ये केली. १९९८ च्या १२ व्या लोकसभेच्या निवडणुकीतील भा.ज.प.ला १८० जागा मिळाल्या. शिरोमणी अकाली दल १०, तेलगू देसमल १२, बिजू जनता दल ८, तृणमूल काँग्रेसला ७, शिवसेना ०६, समता पक्ष १२, अ.द्र.मु.क १८ या सर्व पक्षांच्या पाठींब्यावर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पहिले सरकार स्थापन झाले व अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले. तेरा महिन्यांनी जयललित यांनी या सरकारचा पाठींबा काढून घेतला व सरकार बरखास्त झाले. तेराव्या लोकसभेची निवडणूक जाहीर झाली या निवडणुकीपूर्वी भारत पाकिस्तान यांच्यात कारगिल युद्ध झाले. त्याचा फायदा राष्ट्रीय

लोकशाही आघाडीला झाला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३०२ जागा मिळाल्या काँग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला. भा.ज.प.ला १८२ जागा व राष्ट्रीय काँग्रेसला ११२ जागा मिळाल्या भा.ज.प.ने समान कार्यक्रमाच्या आधारे अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले. वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या इतिहासात दीर्घकाळ चालणारे पहिले आघाडी सरकार साडे चार वर्षे चालले 'आडवाणी व नवे मानव संसाधन मंत्री डॉ. मुरलीमनोहर जोशी यांनी या सरकारमध्ये आपली हिंदुत्ववादी कार्यक्रमपत्रिका प्रत्यक्षात राबविण्याच्या कारवाया करू लागले.'[१]

२००४ साली सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीची स्थापना केली. 'सोनिया गांधी यांच्याबद्दल प्रचार मोहिमेत नरेंद्र मोदी, विनोद कटियार, प्रमोद महाजन बाळासाहेब ठाकरे व उमा भारती यांनी असभ्य भाषेत टीका केली.'[२] प्रसार माध्यमात एन.डी.ए. ने फील गुड व इंडिया शायनिंग यांचा प्रचार केला. परंतु प्रत्यक्षात यू.पी.ए ला २१७ जागा मिळाल्या समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्षाने यु.पी.ए.ला बाहेरून पाठींबा दिला.

सोनिया गांधीनी या सरकारचे पंतप्रधान होण्यास नकार दिला डॉ. मनमोहनसिंग देशाचे पंतप्रधान झाले. १४ राजकीय पक्षांचे यू. पी. ए. चे सरकार सत्तेवर आले. डॉ. मनमोहन सिंगाना हे सरकार चालवण्याचे मोठे आव्हान होते. अशा प्रकारचे सरकार चालविण्याचा कॉग्रेसला पहिला अनुभव होता सरकार चालवण्यासाठी उदार मानसिकता, लवचिकपणा व सरकार अंतर्गत लोकशाही हे नेतृत्व गुण असावे लागतात. यू.पी.ए सरकार समोर अनेक प्रश्न होते त्यामध्ये प्रामुख्याने भारताच्या परराष्ट्र धोरणावर अमेरिकेचा जो प्रभाव पडला. तो कमी करून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे जम्मू काश्मीर समस्या सोडवणे, लालू प्रसाद यादवांच्या दबावामुळे काही गुन्हेगार मंत्रिमंडळात व संसदेत खासदार होते. तरीही डॉ. मनमोहन सिंगनी आपल्या बुद्धिकौशल्याच्या सहाय्याने मनरेगा योजना, शेतकऱ्याची कर्जमाफी, आरोग्य योजना व आधार कार्ड या सामान्य माणसाला आधार देणाऱ्या योजना आखल्या त्यामुळे १५ व्या लोकसभेत काँग्रेस पक्षाला २०६ जागा मिळाल्या व १६ राजकीय पक्षांचे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा आले. परंतु आघाडीचे सरकार असल्यामुळे या सरकारवर पंतप्रधानांना या सरकारवर नियंत्रण ठेवता आले नाही. द्रमुख सारख्या प्रादेशिक पक्षाच्या मंत्र्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला. दुजी सेक्ट्रम घोटाळा, कोळसा घोटाळा, राष्ट्रकुल घोटाळा यासारखे मोठे घोटाळे या सरकार मध्ये झाले तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना निवडणुकीत उमेदवारी नाकारावी हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश मागे घेतला.

देशाच्या राजकारणात १९८९ पासून ते २०१४ पर्यंत जी आघाडी सरकारे अस्तित्वात आली. त्यामध्ये देशाच्या विकासावर फार मोठे परिणाम झाले. आघाडीची सरकारे असल्यामुळे कोणताही धोरणात्मक विकासाचा निर्णय झाला नाही. जे निर्णय झाले ते तडजोडीचे झाले आघाडीच्या सरकारमुळे प्रादेशिक पक्षांची संघटनात्मक ताकद व संख्याबळ वाढले व राष्ट्रीय पक्षाची संघटनात्मक ताकद कमी झाली. भ्रष्टाचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले त्यामुळे देशातील जनता सलग ३० वर्षे असलेल्या आघाड्यांच्या सरकार निर्णय प्रक्रियेतील अस्थिरता यावर मोठ्या प्रमाणात नाराज होती. याचा फायदा २०१४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला झाला.

**बहुमताचे सरकार** –

१९८९ ते २०१४ पर्यंत भारतीय राजकारणात आघाड्यांची अस्थिरतेची सरकारे अस्तित्वात आली. त्यामुळे देशाच्या निर्णय प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झाले. आघाड्यांच्या सरकारमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाले. होते. याचा फायदा भा.ज.प.ला झाला. 'मार्च २०१३ मध्ये भाजपाने नरेंद्र मोदी यांना भाजप संसदीय समितीचे सदस्य म्हणून निवडले आणि पक्षाच्या प्रचार मोहिमेचे प्रमुख म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली निवडणूक मोहीम राबविण्यासाठी पक्षाने बारा सदस्यीय समिती स्थापन केली त्यामध्ये आडवाणी यांना वगळण्यात आले. आक्रमक हिंदुत्वाचा चेहरा असणाऱ्या मोदींनी प्रचाराची सूत्रे हाती घेताच सूत्रबद्ध योजना आखायला सुरुवात केली. संपूर्ण पक्ष आपल्या वर्चस्वाखाली आणला. सप्टेंबर महिन्यात पक्षाने नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील असे जाहीर केल्यावर भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराला वेग आला.'[३] भाजपचे नेतृत्व हेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व निवडले.

२०१४ च्या निवड्णुकीमध्ये भाजपने अनेक मित्र पक्षांना राष्ट्रीय लोकशाही आघाडी मध्ये समाविष्ट केले. यामध्ये प्रामुख्याने शिवसेना, तेलगु देसम, लोकजनशक्ती, शिरोमणी अकाली दल, राष्ट्रीय लोकसमता पक्ष, जम्मू आणि काश्मीर पिपल्स डेमोक्रेटिक पक्ष, अपना दल, ऑल इंडिया एन. आर. कॉंग्रेस, नागालँड पिपल्स फ्रंट, अशा प्रकारचे अनेक पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सत्तेमध्ये सामील झाले. भाजपने या निवडणुकीत २८२ जागा जिंकल्या. १९८९ नंतर पूर्ण बहुमत मिळवणारा एकमेव पक्ष म्हणून भाजपने स्थान निर्माण केले. या सर्वांचे नेतृत्व नरेंद्र मोदी यांनी केले त्यांनी दलित आदिवासी या समाजातही स्थान निर्माण केले. हे स्थान नवहिंदू विचारांच्या आधारे केले जात आहे. नेहरू प्रणीत भारताच्या कल्पनेस आव्हान दिले.

१७ व्या लोकसभा निवडणूकी अगोदर बालाकोटवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी जो हल्ला केला त्याला प्रतिउत्तर म्हणून पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ उध्वस्त केले त्यामुळे देशभर भा. ज. प च्या बाजूने लोकमत तयार झाले याचा फायदा भाजपला झाला. ३०३ जागा मिळाल्या व बहुमताचे सरकार नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आले. बहुमत असल्यामुळे जम्मू काश्मीर मधील ३७० कलमात बदल करण्यात आला त्यामुळे अनेक वर्षे आघाडी सरकार असल्यामुळे देशहिताचे निर्णय होत नव्हते त्या निर्णयाला वेग आला अशा पद्धतीने फायदे बहुमताच्या सरकारचे झालेले दिसून येतात.

**निष्कर्ष -**

वरील विश्लेषणाचा विचार करता भारतीय राजकारणात १९८९ ते २०१४ चा कालखंड हा आघाडी सरकारचा कालखंड होता. या कालखंडात देशाने अस्थिरतेची सरकारे पाहिली या सरकार मध्ये भारतीय जनतेची लोकशाहीची विकसित अवस्था पाहिली. या आघाड्यामूळे देशात प्रादेशिक पक्षांची संख्या वाढली. प्रादेशिक अस्मितेवर आधारित अनेक प्रादेशिक नेतृत्व तयार झाली ती देशाच्या राजकारणात सक्रीय झाले उदा. चंद्रबाबू नायडू, शरदचंद्रजी पवार, ममता बॅनर्जी, मुलायमसिंह यादव, लालू प्रसाद यादव तसेच मायावती, नितीश कुमार, उद्धव ठाकरे या नेतृत्वाने देशाच्या राष्ट्रीय राजकारणात दबावाच्या माध्यमातून आपले निर्णय प्रक्रियेत स्थान निर्माण केले. राष्ट्रीय कॉंग्रेस व भारतीय जनता पक्ष या भारत भर प्रभावी असलेल्या राजकीय पक्षांना आपली ध्येय धोरणे प्रभाविपणे राबवता आली नाहीत. राजकारणात दोन प्रभावी आघाड्या निर्माण झाल्या. त्या म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडी हि भाजपच्या नेतृत्वाखाली व संयुक्त पुरोगामी आघाडी व संयुक्त पुरोगामी आघाडी निर्माण झाली. या आघाड्या सत्ता केंद्रित आघाड्या होत्या त्यांचे कडे कोणतीही विशेष विचारधारा नव्हती, त्यामुळे देशाला तडजोडीची स्थिर आघाडी सरकारे मिळाली. त्या सरकारमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला कारण आघाडी सरकारमुळे त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवता येत नसे ही अवस्था तीस वर्षे राहिली या अवस्थेला देशातील जनता नाराज होती याचा फायदा २०१४ च्या निवडणुकीत भाजपाला झाला त्यांनी या निवडणुकीत लोकांना विदेशी धन, काळा पैसा परत आणण्याची आश्वासने तसेच अच्छे दिन, भ्रष्टाचार मुक्त भारत महागाईवर नियंत्रण हि आश्वासने दिली. या धोरणावर देशातील जनता आकर्षित झाली. भाजपचे बहुमताचे सरकार २०१४च्या निवडणुकीत आले.

या सरकारने जम्मू काश्मीरमधील ३७० कलमातील बदल, आयोध्यातील राम मंदिर, शेतकऱ्याला वार्षिक आठ हजार रुपये या प्रश्नावर पुन्हा २०१९ ची लोकसभा निवडणूक बहुमताने जिंकली आहे. भारतामध्ये गेली नऊ वर्षे बहुमताचे हिंदुत्ववादी सरकार अस्तित्वात आले त्यांनी बहुमताच्या जोरावर नवीन शैक्षणिक धोरण, भांडवलदारांना मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य केले आहे. या बहुमताच्या सरकार मध्ये महागाई प्रचंड वाढली आहे. ज्या अपेक्षेने हे सरकार लोकांनी निवडून दिले त्यांचा अपेक्षाभंग झाल्याचे लोकांच्या लोकमतातून दिसून येते. या सरकारने देशामध्ये दळणवळणा मध्ये मोठ्या प्रमाणात क्रांती करून रस्त्याचे जाळे निर्माण केले आहे. भारताचे परराष्ट्रीय धोरणातून जगभर निर्यात मोठ्या प्रमाणात वाढवली आहे वेगवेगळ्या देशाशी आपले हितसंबंध प्रस्थापित केले आहेत परंतु देशातील बेरोजगारी, गरिबी यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. शेतकऱ्यांच्या खते- बी बियाणे यांचे दर वाढले आहेत. या सरकारने अनेक हिंदुत्वधार्जीण निर्णय घेतले आहेत त्यामुळे येणाऱ्या २०२४ च्या निवडणूकीत भारतातील जनता बहुमताचे सरकार देणार की आघाडयांचे सरकार येणार हे येणारा काळच ठरवेल असे वरील विश्लेषणातून दिसून येते.

**संदर्भ**

१) चौसाळकर अशोक - चौदावी लोकसभा निवडणूक, नव्या राजकारणाची सुरूवात, प्रबोधन प्रकाशन ज्योती कुलकर्णी प्रसाद (संपा.) जून २००४, इचलकरंजी पृ. क्र. ०९

२) उपरोक्त पृ. क्र. १९

३) पाटील भारती - सोळाव्या लोकसभेचे पूर्वरंग, प्रबोधन प्रकाशन ज्योती, ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१३, कुलकर्णी प्रसाद (संपा.) इचलकरंजी पृ. क्र. १०३

**संदर्भ ग्रंथ यादी**

१) भोळे भा. ल. - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे बुक डीस्ट्रीब्युटर्स नागपूर सप्टेंबर २०१२

२) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास - भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, २०१० पुणे

३) पवार प्रकाश - कॉंग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे जानेवारी २०१६

४) कुलकर्णी प्रसाद- प्रबोधन प्रकाशन ज्योती, जून २०१४, ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१३ समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी

५) गावस्कर महेश- समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल -जून २००९, जाने -मार्च २०१४ प्रकाशन विलास वाघ पुणे

६) सप्तर्षी कुमार (संपा.) सत्याग्रही विचारधारा अंक जून २०१९, जुलै २०१९ पुणे

७) शिरसाठ विनोद (संपा.) - साधना साप्ताहिक ८ जून २०१९ पुणे.